महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत**
**(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४**
**दूरध्वनी क्र.:** -020-29709617 वेबसाईट :-www.mscepune.in **ई-मेल** :-mscegcctbc@gmail.com

**अति महत्वाचे:**
**परिपत्रक**

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२४/390
दिनांक - 24/ 1 /२०२४.

**प्रति,**

**संस्थाचालक,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्था,**
**व संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय:- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) व शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व (GCC-SSD-CTC) प्रमाणपत्रातील नावांमधील स्पेलिंग दुरूस्ती व दुय्यम प्रमाणपत्राबाबत.**

**संदर्भ:-** शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-०१२१/प्र.क्र.०४/एसडी-२ दि.२७ एप्रिल २०२३.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC), शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC), स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग इन्स्ट्रक्टर्स अ‍ॅण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) **प्रमाणपत्रावरील नाव दुरूस्ती व दुय्यम प्रमाणपत्रसाठी दि.२४/०१/२०२४ पासुन ऑनलाईन सुविधा** उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**सदर प्रस्ताव विहीत शुल्कासह ऑनलाईन पद्धतीने दाखल करण्यासाठी परीक्षा परिषदेच्या https://www.mscepune.in या संकेतस्थळावर व संस्था लॉगिनमध्ये दि.२४/०१/२०२४ पासून लिंक देण्यात येत आहे.**

संबंधित संस्थाचालक व विद्यार्थ्यांनी नाव दुरूस्ती व दुय्यम प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव सदर लिंकद्वारे खाली दिलेल्या कृतीओघ तक्त्यानुसार (Flow Chart) आवश्यक कागदपत्रांसह सादर करायचा आहे.

तसेच सदर प्रस्ताव दाखल केल्यानंतर नाव दुरूस्ती होणार असेल तर मुळ प्रमाणपत्र या कार्यालयास पाठविणेबाबत आपणास सदर लॉगिन मध्ये कळविण्यात येईल. त्यानंतरच आपण सदर नाव दुरूस्ती करावयाचे **मुळ प्रमाणपत्र ७ दिवसांत** या कार्यालयात स्पीड पोस्ट द्वारे/समक्ष जमा करायचे आहेत, फेब्रुवारी २०२३ जीसीसी व जुलै २०२३ जीसीसी/जीसीसी-टीबीसी/जीसीसी-एसएसडी-सीटीसी परीक्षेचे प्रमाणपत्र डिजीटल प्रणालीद्वारे वितरीत केलेले असल्यामुळे त्याची मुळ प्रत या कार्यालयास पाठविण्याची आवश्यकता नाही. **नाव दुरूस्तीचे मुळ प्रमाणपत्र या कार्यालयास पाठविल्यानंतरच आपणांस सदर नाव दुरूस्ती केलेले डिजीटल प्रमाणपत्र सदर लॉगिन मध्ये १५ ते ३० दिवसांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील.**

अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्याच्या प्रमाणपत्रावरील **फक्त स्पेलिंग दुरूस्ती** असेल व विद्यार्थ्याचे नाव, वडिलांचे नाव/ पतीचे नाव, आईचे नाव, आडनाव यात पुर्ण बदल होत नसेल तरच संस्था लॉगिन मध्ये देण्यात आलेल्या लिंकद्वारे सादर केलेले परीपुर्ण प्रस्ताव स्विकारले जातील. **स्पेलिंग दुरुस्तीमुळे पूर्ण नावात, विद्यार्थ्याच्या नावात, वडिलांच्या/पतीच्या नावात, आडनावात, आईच्या नावात पूर्ण बदल होत असल्यास अशा दुरूस्त्या करून दिल्या जाणार नाहीत तसेच सदर नाव दुरूस्तीसाठी भरलेल्या शुल्काचा परतावा (REFUND) होणार नाही याची नोंद द्यावी.**

**सोबत:-** ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी कृतीओघ तक्ता.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ४.**

DESKTOP/trutipatra

# ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी कृतीओघ तक्ता (Flow Chart)

www.mscepune.in संकेतस्थळाला भेट देणे.

↓

GCC - TBC Examination या Tab वर क्लिक करा.

↓

GCC/GCC-TBC/GCC-SSD-CTC नाव दुरुस्ती/दुय्यम प्रमाणपत्रासाठी च्या लिंकवर क्लिक करा.

↓

SIGN UP वर क्लिक करा. रजिस्ट्रेशन करून युजर आयडी व पासवर्ड CREATE करा.

↓

रजिस्ट्रेशन झाल्यानंतर CREATE केलेल्या युजर आयडी व पासवर्ड द्वारे LOGIN करा.

↓

नाव दुरुस्ती/दुय्यम यापैकी योग्य पर्यायावर क्लिक करून अचूक माहिती भरा व कागदपत्र अपलोड करा.

↓

Make Payment Tab वर क्लिक करुन नाव दुरूस्ती/दुय्यम साठीचे शुल्क भरावे.

↓

Print Application वर क्लिक करावे.

↓

आपण सादर केलेल्या नाव दुरूस्ती/दुय्यम प्रस्तावाची या कार्यालयामार्फत पडताळणी होईल.

↓

नाव दुरूस्ती होणार असेल तर मुळ प्रमाणपत्र या कार्यालयास पाठविणेबाबत आपणास सदर लॉगिन मध्ये कळविण्यात येईल. त्यानंतरच आपण सदर नाव दुरूस्ती करावयाचे मुळ प्रमाणपत्र या कार्यालयास पाठवावे.

↓

सर्व कागदपत्रांसह नाव दुरूस्ती/दुय्यम प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव पुर्ण असेल तरच डिजीटल स्वाक्षरीचे प्रमाणपत्र आपल्या लॉगिन मध्ये उपलब्ध होईल. डाऊनलोड वर क्लिक करुन प्रिंट काढावी.